वर्ष : ०४ | अंक: ४३ | मुंबई, मंगळवार १८ सप्टेंबर २०१८ ते २४ सप्टेंबर २०१८ | पृष्ठ: ४

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. THW/205/2016-2018


Website: www.policebatmipatra.com www.policebatmipatra.in

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 प्रकाश आंबेडकर - ओवेसींची युती

3 → दावा आणि कांगावा

मोदी म्हणाले, चार वर्षात केली ६० वर्षांची सफाई... ← 4




# आता गृहकर्जे आणखी महागणार?

**मुंबई- कर्जावरील व्याजदरांमध्ये झालेल्या वाढीमुळे सर्व प्रकारच्या कर्जावरील 'ईएमआय' अर्थात दरमहा हप्त्यामध्ये चालू आर्थिक वर्षात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. चालू महिन्यात स्टेट बँक, आयसीआयसीआय बँक, एचडीएफसी बँक, बँक ऑफ बडोदा आणि युनियन बँक ऑफ इंडिया आदींनी 'एमसीएलआर'मध्ये ०.०५ ते ०.२० टक्क्यांची वाढ केली आहे. या पैकी एचडीएफसी बँक आणि स्टेट बँकेने 'एमसीएलआर'मध्ये ०.२० टक्के वाढ केली आहे. त्यामुळे सार्वजनिक क्षेत्रातील देशातील सर्वात मोठी बँक असणाऱ्या स्टेट बँकेच्या वर्षभराच्या कर्जाचा 'एमसीएलआर' आता ८.४५ टक्क्यांवर पोहोचला आहे. तो यापूर्वी ८.२५ टक्के होता. सर्वात महत्त्वाचे म्हणजे यंदा मार्चनंतर 'एमसीएलआर'मध्ये अर्धा टक्क्याची वाढ नोंदविण्यात आली आहे.**



'एमसीएलआर'मध्ये वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर कर्जाच्या दरमहा हप्त्यांमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. उदाहरणादाखल मार्चमध्ये स्टेट बँकेच्या 'एमसीएलआर'मध्ये ०.५० टक्के वाढ झाल्याने पन्नास लाख रुपयांचे दहा वर्षे मुदतीचे कर्ज घेणाऱ्यांना आता दरमहा १५०० रुपयांचा अतिरिक्त बोजा पडेल. बँकेच्या काही अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार अजूनही काही काळ व्याजदर वाढण्याची शक्यता आहे. ॲक्सिस बँकेचे रिटेल बँकिंग विभागाचे संचालक राजीव आनंद यांच्या मते काही महिन्यांपूर्वी कर्जांवरील व्याजदरांमध्ये मोठी घट झाली होती. मात्र, आता व्याजदरांमध्ये वाढ होत आहे. त्यामुळे कर्ज घेतलेल्यांनी दरमहा अतिरिक्त हप्ता देण्याची तयारी ठेवायला हवी. अर्थव्यवस्थेची वाढ होत असल्याने मोठ्या प्रमाणात बाजारपेठेत मागणी वाढली आहे. त्यातच आंतरराष्ट्रीय बाजारांत कच्च्या तेलाचे दर वाढत असल्याने महागाई वाढण्याची भीती वर्तविण्यात येत आहे. त्यामुळे व्याजदरांत वाढ होण्याची शक्यता आहे. त्यातच पुन्हा डॉलरच्या तुलनेत रुपया सातत्याने घसरत असल्यानेही व्याजदरांत आणखी वाढ होण्याचीही शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर आगामी पतधोरण आढाव्यादरम्यान रिझर्व्ह बँक व्याजदरांत वाढ करण्याची शक्यता आहे.

# अमरावतीमध्ये पोलीसच असुरक्षित!

**अमरावती - काही दिवसांपूर्वी तीन गुंडांनी अचलपुरात सहायक पोलीस उपनिरीक्षकाची केलेली हत्या, त्याआधी गावठी दारू अड्ड्यावर छापा टाकण्यासाठी गेलेल्या पोलीस नाईकाची हत्या आणि अनेकदा वाहतूक पोलिसांवर हात उचलण्याचे प्रकार पाहता पोलिसांचा धाक कमी होतोय की काय, असा प्रश्न सर्वसामान्यांना पडू लागला आहे. अशा घटनांमुळे एकीकडे पोलिसांचे मनोबल खच्ची होत असताना उपाययोजनांची कमतरता जाणवत आहे.**



गुन्हेगारांवर पोलिसांचा वचक हवाच. त्यासाठी पोलिसांकडून कायद्याचादेखील धाक दाखविला जातोच. पण त्यातूनच अचलपुरात थेट पोलिसाची हत्या होण्याचा प्रसंग घडला. एका हॉटेलसमोर रात्री उशिरा मद्यपी गुंडांचे एक टोळके गस्तीवरील पोलीस पथकाला दिसले. पोलिसांनी त्यांना चांगलाच दम दिला होता. या रागातून त्यांनी नंतर या पोलिसांना शोधण्यास सुरुवात केली. पण त्या वेळी सेवा आटोपून घरी परत जात असलेले सहायक पोलीस उपनिरीक्षक शांतीलाल पटेल त्यांना एकटेच दिसले. गुंडांनी सळईने त्यांच्यावर वार करताना क्रौर्याची परिसीमा गाठली. या घटनेत शांतीलाल पटेल यांचा हकनाक बळी गेला.

या घटनेमागे कारण कोणतेही असले तरी पोलिसाचा जीव घेण्यापर्यंत गुंडांची मजल पोहोचतेच कशी, हा सवाल अनेकांना भेडसावू लागला आहे.

उर्वरित पृष्ठ 2 वर

# लालबाग राजाच्या कार्यकर्त्यांची दादागिरी, पोलीस अधिकाऱ्याला धक्काबुक्की

**मुंबई** - मुंबईत प्रसिद्ध लालबागच्या राजाच्या दरबारात पुन्हा हाणामारी झाल्याचा प्रकार घडला आहे. झोन ३ चे पोलीस उपायुक्त अभिनाश कुमार यांच्याशी मुजोरी करत राजाच्या कार्यकर्त्यांनी त्यांना धक्काबुक्की केली. हा संतापजनक प्रकार आज घडला आहे. स्थानिक रहिवाशी आणि कार्यकर्ते हे रांगेशिवाय आपल्या ओळखीच्या व्यक्तींना थेट स्टेजवर चढून चरणस्पर्श घेण्यासाठी बाप्पाच्या समोरून एक मार्ग खुला ठेवण्यात आला आहे. या खुल्या मार्गाद्वारे अतिमहत्वाच्या व्यक्तींना आणि ओळखीच्या व्यक्तींना रांगेशिवाय झटपट दर्शन दिले जाते. त्याचठिकाणी लालबागचा राजा मंडळाचे कार्यकर्ते आणि पोलीस



उपायुक्त अभिनाश कुमार यांच्याशी आधी शाब्दिक बाचाबाची झाली. त्यांनतर पोलीस अधिकाऱ्याच्या अंगावर कार्यकर्ते धावून गेले. ही अरेरावी पाहून पोलीस उपायुक्त आणि अन्य पोलीस अधिकारी संतापले होते.



दरवर्षी होणारी गर्दी पाहता मोठा पोलिसांचा फौजफाटा तैनात करण्यात येतो. मात्र, कर्तव्यावर असलेले पोलीस आणि स्थानिक कार्यकर्ते यांच्यात ओळखीच्या व्यक्तींना थेट रांगेशिवाय बाप्पाचे चरण दर्शन देण्यावरून तसेच अन्य कोणत्या ना कोणत्या कारणावरून धक्काबुक्की, हाणामारी राजाच्या दरबारात होतच असते. त्याचप्रमाणे कर्तव्य बजावत असलेल्या पोलीस उपायुक्त अभिनाश कुमार यांना काही कार्यकर्त्यांनी अपशब्द वापरून त्यांच्याशी दादागिरी केली. त्यानंतर पोलीस उपायुक्त यांना राग अनावर झाला नाही. त्यांनी त्या मुजोर कार्यकर्त्यांना ताब्यात घेण्यासाठी बॅरिकेट चढून पलीकडे जाण्याचा प्रयत्न केला. याआधी देखील एका महिला पोलिसांच्या श्रीमुखात राजाच्या कार्यकर्त्याने लगावली होती. तर दर्शनासाठी आलेल्या भाविकांशी अभद्रपणे कार्यकर्ते वागतात हे अनेकदा समोर आले आहे.

# देशाचे पंतप्रधान अनपढ आणि गंवार बोलणारा माथेफिरु संजय निरुपम हा मनोरुग्ण - हिरासिंह धनिक



'देशाचे पंतप्रधान हे अनपढ आणि गंवार असे बेताल वक्तव्य करणारा संजय निरुपम हा स्वतः मनोरुग्ण झाला आहे असे वाटते' असे उद्गार भारतिय नमो संघ चे महाराष्ट्र संचालक हिरासिंह धनिक यांनी काढले. ते पुढे म्हणाले की राजकारणात बेडूक उडया मारत मारत तो आता मुंबई प्रदेश काँग्रेस अध्यक्ष बनला आहे. यापूर्वी ही त्याने कर्नाटकचे राज्यपाल वजूभाई बालाजी यांना कुत्रा म्हणून संबोधले आहे. त्याही पुढे भारतिय सेनेने केलेले सर्जिकल स्ट्राईक हे फर्जी स्ट्राईक आहे असा शोध लावला होता. असे बेताल वागणे हे मनोरुग्ण झालेल्याचे पुरावे देतात असे माझे मत आहे. यांची पक्ष श्रेष्ठींनी ताबडतोब अध्यक्ष पदावरुन हकलपट्टी करावयास हवी असे हिरासिंह धनिक यांनी पत्रकारांना सांगितले व निषेध व्यक्त केला.

# नवसाला पावणारा गोल्डन नेस्टचा राजा



# दु:खद निधन



कृष्णाजी यशवंत पावसकर यांचे सोमवार दिनांक १७/०९/२०१८ रोजी अल्पशा आजाराने वयाच्या ७९ वर्षी निधन झाले. कविवर्य म्हणून त्यांची जनमानसात ख्याती होती. त्यांनी वाजवा रे वाजवा हे नाटक रंगभूमीवर आणून खूप नावलौकीक केले होते. अशा या कलाप्रेमी, विद्वान, स्वाभिमानी कवीला पोलिस बातमी पत्रातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

# राष्ट्रीय दृष्टिहीन ध्वज निधी संकलन मोहिमेचे उद्घाटन

## अंध - दिव्यांग व्यक्तींच्या समस्यांबाबत शासन स्तरावर पाठपुरावा करण्याचे राज्यपालांचे आश्वासन





दृष्टिहीन आणि दिव्यांग व्यक्तींच्या विविध प्रलंबित समस्यांचा पाठपुरावा करण्यासाठी आपण लवकरच संबंधित मंत्र्यांसह अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करून समस्यांचा पाठपुरावा करू असे आश्वासन राज्यपाल चे. विद्यासागर राव यांनी दिले.

नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइन्ड या संस्थेच्या वतीने दृष्टिहीन व्यक्तींच्या राष्ट्रीय ध्वज निधी संकलन मोहिमेचा शुभारंभ राज्यपालांच्या उपस्थितीत राजभवन येथे शुक्रवारी (दिनांक १४) पार पडला त्याप्रसंगी ते बोलत होते.

अंध व्यक्तींना मतदानाचा हक्क स्वतंत्रपणे बजावता यावा यासाठी त्यांना ब्रेल लिपीमध्ये मतपत्रिका

उर्वरित पृष्ठ 2 वर

# प्रकाश आंबेडकर – ओवेसीची युती
## ‘मिशन २०१९’ साठी महाराष्ट्रात नवं राजकीय समीकरण

**मुंबई -** अॅड. प्रकाश आंबेडकर यांचा भारिप-बहुजन महासंघ आणि असदुद्दीन ओवेसी यांचा एमआयएम यांच्यात लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीसाठी युती होणार असून २ ऑक्टोबरला औरंगाबादच्या जाहीर सभेत तशी घोषणा करण्यात येणार आहे.



राज्य विधानसभेत एमआयएमचे दोन आमदार आहेत. भायखळ्याचे वारिस पठाण आणि औरंगाबाद (मध्य)चे सय्यद इम्तियाज जलिल. भारिप-बहुजन महासंघाचा एकच शिलेदार विधिमंडळात आहे. बाळापूरचे (जि. अकोला) बळीराम सिरसकर गेल्या निवडणुकीत विजयी झाले होते. प्रकाश आंबेडकर यांचा अकोला, वाशिम आणि बुलडाणा या तीन जिल्ह्यांमध्ये चांगला प्रभाव आहे. दलितांबरोबरच इतर जातींना जोडून राजकारण करण्याचा त्यांचा पॅटर्न विशेषत: अकोला जिल्ह्यात बऱ्यापैकी यशस्वी झाला. पूर्व विदर्भ आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यातही त्यांच्या समर्थकांची संख्या बऱ्यापैकी आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू असलेले प्रकाश उपाख्य बाळासाहेब आंबेडकर यांनी आता एमआयएमसोबत जाण्याची भूमिका घेतल्याने रिपब्लिकन पक्षांच्या विविध गटांनी एकत्र येण्याची उरलीसुरली शक्यताही संपुष्टात आली आहे. रिपाईंच्या एका गटाचे अध्यक्ष रामदास आठवले आधीच भाजपासोबत आहेत, तर दुसरे नेते प्रा. जोगेंद्र कवाडे (पीरिपा) काँग्रेसच्या जवळचे आहेत. डॉ. राजेंद्र गवई (गवई गट) अलीकडे काँग्रेसवर टीका करतात पण त्यांची नेमकी भूमिका स्पष्ट झालेली नाही.

एमआयएमची मुख्य भिस्त मुस्लिम मतदारांवर आहे. नांदेड महापालिकेत एकेकाळी ११ नगरसेवक निवडून आल्यानंतर या पक्षाची जोरदार चर्चा सुरू झाली. २०१४ मध्ये दोन आमदार निवडून आणून पक्षाने महाराष्ट्र विधानसभेत प्रवेश मिळविला. आंबेडकर यांना मानणारा दलित मतदार आणि एमआयएमचा मुस्लिम मतदार असे समीकरण जुळले तर ही युती मर्यादित का होईना पण चमत्कार करू शकेल. या युतीमुळे एरवी काँग्रेस-राष्ट्रवादीकडे जाणाऱ्या मतांचे विभाजन होऊन त्याचा फायदा भाजपा-शिवसेनेला होऊ शकेल. पण अकोला, नांदेड, बुलडाणा अशा काही जिल्ह्यांमध्ये भाजपा-शिवसेनेलादेखील फटका बसू शकतो.

अॅड.आंबेडकर यांनी दलित नेतृत्वाबाबत विशेषत: गेल्या दोन-तीन वर्षांत इतर रिपाइं नेत्यांना चर्चेत राहण्याबाबत निश्चितच मागे टाकले आहे. भीमा-कोरेगाव प्रकरणी ते विशेषत्वाने जाणवले. प्रसिद्धी माध्यमांमध्ये आंबेडकरच चर्चेत होते. मात्र, आंबेडकर यांनी या निमित्ताने दलित मतदारांच्या मनाची पकड घेतली आहे का हे मतदानाच्या माध्यमातून अद्याप दिसलेले नाही. गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत आंबेडकर यांनी दोन-अडीच डझन पक्षांची मोट बांधली होती पण त्यातून मतांचे पाणी बाहेर काही आले नाही. आंबेडकर यांच्या एकूण राजकीय वाटचालीचा विचार केला तर त्यांच्यामुळे झालेल्या मतविभाजनाचा जास्त फायदा भाजपालाच होत आला आहे.

# ३९४ पालिका शाळांमध्ये बालवाड्या

***पालिका शाळांमधील पटसंख्या वाढावी यासाठी प्रशासनाने बालवाडीच्या माध्यमातूनच प्रयत्न सुरू केले आहेत. त्यासाठी खासगी सेवाभावी संस्थांच्या सहकार्याने तब्बल ३९४ बालवाड्या सुरू करण्यात येणार आहेत.***

खासगी संस्थांच्या मदतीने सुरू करण्यात येणाऱ्या ३९४ पैकी १३३ बालवाड्या मराठी माध्यमांच्या असून बंद पडू लागलेल्या मराठी शाळा वाचविण्यासाठी पालिका प्रशासनाने हे पाऊल उचलले आहे. भविष्यात बालवाड्यांची संख्या ९००वर पोहोचेल आणि प्रत्येकी ३० पटक्षमता असलेल्या बालवाड्यांमधील विद्यार्थ्यांची पटसंख्या २७ हजार इतकी होईल, असा विश्वास पालिकेच्या शिक्षण विभागाकडून व्यक्त करण्यात आला आहे.



यातील ९२ उर्दू माध्यमाच्या, ७८ हिंदी माध्यमाच्या, २५ गुजराती माध्यमाच्या, २३ इंग्रजी माध्यमाच्या, कन्नड व तेलुगु माध्यमाच्या प्रत्येकी १०, तामिळी माध्यमाच्या ९, सेमी इंग्रजी माध्यमाच्या सहा, तर मुंबई पब्लिक स्कूलअंतर्गत एका बालवाडीचा समावेश आहे. यातील सर्वाधिक म्हणजे ४४ बालवाड्या ‘एफ उत्तर’ विभागात असतील. त्यामुळे येथील बालवाड्यांची एकूण संख्या ७६ होणार आहे. या खालोखाल ‘एच पूर्व’ विभागात ३८ बालवाड्या सुरु होणार आहे. येथील बालवाड्यांची संख्या ६० होणार आहे. ‘पी उत्तर’ विभागात ३५ नव्या बालवाड्यांची सुरुवात होणार असल्याने त्या विभागातील बालवाड्यांची संख्या ५५ होणार आहे. विशेष म्हणजे महापालिकेच्या २४ प्रशासकीय विभागांपैकी दक्षिण मुंबईतील ‘बी’ व ‘सी’ या दोन विभागांमध्ये यापूर्वी महापालिकेच्या बालवाड्या नव्हत्या. येथे प्रथमच १७ बालवाड्या सुरू होणार आहेत.

सध्या पालिकेच्या ५०४ बालवाड्या सुरू असून त्यापैकी सर्वाधिक म्हणजे १९० बालवाड्या या मराठी माध्यमाच्या आहेत. त्याखालोखाल ११४ हिंदी माध्यमाच्या, १०७ उर्दू माध्यमाच्या, ६६ इंग्रजी माध्यमाच्या, १० तामिळ माध्यमाच्या आहेत. या खालोखाल गुजराती माध्यमाच्या ९, सेमी इंग्रजी ६, तर कन्नड व तेलगू माध्यमाच्या प्रत्येकी १ बालवाडी आहे. यांची पटक्षमता १५ हजार १२० आहे.

# सरकारला इंधन दरकपातीची सुबुद्धी दे!
## अशोक चव्हाण यांचे साकडे

**मुंबई :** मुंबईत गणेशोत्सवाची धडाक्यात सुरुवात झाली असून बडे राजकीय नेते मानाच्या गणपतींना साकडे घालण्यासाठी रीघ लावत आहेत. भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी लालबागचा राजा आणि श्री सिद्धिविनायकाचे दर्शन घेतले. तर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष अशोक चव्हाण यांनीही सरकारला इंधन दरकपात करण्याची सुबुद्धी देण्यासाठी लालबाग चरणी साकडे घातले.



यंदाही भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा यांनी मुख्यमंत्र्यांसह प्रथम लालबागचा राजा आणि नंतर सिद्धिविनायक चरणी हजेरी लावली. तर राजाच्या दर्शनासाठी दुपारी ज्येष्ठ अभिनेते रजा मुराद, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष अशोक चव्हाण, आमदार भाई जगताप यांच्यासह विविध नेतेमंडळी हजर होती. अशोक चव्हाण यांनी चिंचपोकळी चिंतामणीच्या दर्शनावेळी येथील बच्चेकंपनीसोबतही संवाद साधला.

# पेट्रोल डिझेल पुन्हा महागलं, गोंदिया आणि मनमाडमध्ये नव्वदी पार

**पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या दरांमुळे सर्वसामान्यांमध्ये चिंतेचं वातावरण असताना शनिवारी पुन्हा एकदा इंधन दरात वाढ झाली आहे. पेट्रोल ३४ पैसे तर डिझेल २५ पैशांनी महागलं आहे. दर वाढल्यामुळे मुंबईत पेट्रोलचा दर प्रतिलिटर ८९.०१ रुपये झाला असून, डिझेलचा दर ७८.०७ रुपये प्रतिलिटर झाला आहे. विशेष म्हणजे गोंदिया आणि मनमाडमध्ये पेट्रोलने नव्वदी पार केली आहे.**



दिल्लीत पेट्रोल ३५ पैसे तर डिझेल २४ पैशांनी महाग झालं आहे. दिल्लीत पेट्रोलचा दर प्रतिलिटर ८९.०१ रुपये तर डिझेलचा दर ७८.०७ रुपये झाला आहे.

गेल्या काही दिवसांपासून पेट्रोल आणि डिझेलच्या दरात सतत वाढ होत आहे. बुधवारी इंधन दरात कोणतीही वाढ झाली नव्हती. गुरुवारी पेट्रोल १३ पैशांनी तर डिझेल ११ पैशांनी महागले होते, तर शुक्रवारी पेट्रोल २८ पैशांनी तर डिझेल २४ पैशांनी महागले. सलग १७ दिवस वाढ झाल्यावर फक्त बुधवारी पेट्रोल आणि डिझेलचे दर वाढले नव्हते. इंधन दरवाढीचा निषेध करत काँग्रेससह सगळ्याच विरोधकांनी भारत बंद पुकारला होता. तसेच पेट्रोल आणि डिझेलचे दर जीएसटीच्या कक्षेत आणावेत अशीही मागणी केली होती. तर पेट्रोल आणि डिझेलचे दर सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेले आहेत त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशाला महागाईच्या अंधारात ढकलले आहे अशी टीका असदुद्दीन ओवेसी यांनी केली आहे.

# महिला डब्यात विष्ठा फेकणारा विकृत अटकेत

**मुंबई -** लोकल ट्रेनमधील महिलांच्या डब्यात हस्तमैथुन करणारा आणि मानवी विष्ठा फेकणाऱ्या विकृत तरुणाला पकडण्यात रेल्वे पोलिसांना यश आलंय. रेल्वे पोलिसांनी यासाठी विशेष शोध मोहीम राबवली होती. त्याला शोधण्यात ३० दिवसांहून अधिक काळ लागला. पकडण्यात आलेल्या तरुणाचं नाव दिनेश लक्ष्मण दुवरे असं आहे. ३० वर्षाचा असलेला हा विकृत तरुण कर्जतचा राहणारा आहे. गेल्या महिन्याभरापासून त्याने उच्छाद मांडला होता. महिन्याभरात त्याने १० लोकल गाड्यांमधील महिलांच्या डब्यात मानवी विष्ठा फेकली होती, अशी माहिती रेल्वे पोलिसांनी दिली.



रेल्वे पोलिसांना सतत चकवा देणारा दुवरे हा ९ सप्टेंबला बदलापूरच्या दिशने जाणाऱ्या नव्या कोऱ्या लोकलमध्ये सकाळी ६.५६ला चढला. प्लास्टिकची एक पिशवी हातात घेऊन तो महिला डब्यात घुसला. डब्यात कुणी नाही हे बघून त्याने हस्तमैथुन केले. यानंतर त्याने प्लास्टिकच्या पिशवीत आणलेली मानवी विष्ठ डब्यातील सीटवर फेकून पळ काढला. महिला प्रवासी डब्यात घुसण्याच्या किमान १५ मिनिटं आधी येऊन तो हा विकृतपणा करत होता. रेल्वे पोलिसांनी लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात त्याची ही विकृती टिपली गेली.

# तुमचा चोरीला गेलेला फोन असा सापडतो...

**मुंबई : तुमचा फोन चोरी झाल्यानंतर तो काहीतरी चमत्कार होवून परत मिळावा असं सर्वांना वाटतं. फोन कुणाचाही चोरी झाला तर त्याला धक्काच बसतो, कशातही मन लागत नाही. तेव्हा तुमचा फोन चोरी होवू नये, आणि झाला तर तो परत मिळावा, यासाठी काही सेटिंग्ज तुमच्या फोनमध्ये करून घ्याव्या लागतील. त्या आधी खालील एक सत्य घटना समजून घ्या, त्यावरून तुम्हाला लक्षात येईल की चोरी गेलेला फोन हा परत मिळतो.**

***२० वर्षाच्या मुलीने फोन परत मिळवला***

आपल्या स्मार्ट फोनमध्ये एक स्मार्ट फीचरचा वापर करून मुंबईच्या २० वर्षीय मुलीला तिचा फोन परत मिळाला आहे. जिनत हक असं या मुलीचं नाव आहे. तिने तिच्या स्मार्टफोनवर माय अॅक्टीव्ह हे फीचर लावलं होतं. जिनतने फक्त आपला फोनच परत मिळवला नाही, तर चोराला पकडण्यातही ती यशस्वी झाली.

***रेल्वे प्रवासात फोन चोरीला***

जिनतचा फोन रविवार ५ ऑगस्ट २०१८ रोजी रेल्वे प्रवासात चोरी झाला. तिच्याकडे जिओमी रेड्मी एमआय ४ हा फोन होता. तिने फोन शोधण्याचा प्रयत्न केला पण मिळाला नाही.

***घरी आल्यावर चोराची अॅक्टिव्हिटी पाहिली***

घरी गेली तेव्हा तिला लक्षात आलं की, आपल्या फोनमध्ये माय अॅकिव्ह फीचर ऑन आहे. दुसऱ्याच्या फोनवरून आपण आपला फोन ट्रॅक करू शकतो. माय अॅक्टीव्ह फीचर सर्व गूगलच्या अकाऊंटसाठी असतं. हा तुमच्या मोबाईल डिव्हाईसची अॅक्टीव्हिटी ट्रॅक करत असतो, ज्यात हे अकाऊंट लॉगइन आहे.

***ईमेलवर फोन चोरी झाल्यानंतरची सर्व माहिती***

या फीचरच्या मदतीने सोमवारी जिनत यांना ईमेलवर त्यांचा फोन चोरी झाल्यानंतरची सर्व माहिती मिळत गेली, चोरी करणाऱ्याच्या घडामोडी समजत गेल्या. जिनत एक प्राथमिक शिक्षक आहे. आपलं काम संपल्यावर जेव्हा जिनतने आपला मोबाईल चेक केला, तेव्हा तिला समजलं की या व्यक्तीने दादर रेल्वे स्टेशनवर, एक तिकीट बूक केलं आहे. यानंतर ती त्वरीत दादर रेल्वे स्टेशनला पोहोचली.

***चोराजवळ जावून फोन ताब्यात घेतला***

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार त्या दिवशीच जिनत ०८.३० वाजता दादर स्टेशनवर रेल्वे पोलिसांकडे गेली, आरपीएफ नितिन मिस्त्री यांना संपूर्ण घटना सांगितली. या माहितीच्या आधारावर चोराला, पुडुचेरी एक्स्प्रेसमधून पकडण्यात आलं. चोराचं नाव सेल्वराज शेट्टी असं होतं. शेट्टी हा ३२ वर्षांचा आहे, तो मालाड पश्मिला राहतो. सुरूवातीला त्याने सर्व आरोप नाकारले, नंतर त्याच्याकडून फोन हस्तगत करण्यात आला.

***पोलिसांकडून कौतुक***

आरपीएफ अधिकाऱ्यांनी सांगितलं, आम्हाला आनंद आहे, जिनतने प्रसंगावधान राखून, चोराला पकडण्यात मदत केली आणि आरोपीविरोधात एफआयआरदेखील दाखल केली. अनेक वेळा असं होतं, आम्ही चोराला पकडतो, त्यानंतर फोन मिळाल्यावर, चोरावर एफआयआर दाखल करण्यात लोक मागेपुढे करतात.

***तुमच्या फोनमध्ये देखील, हे फीचर सतत अॅक्टिव्ह ठेवा***

जर तुमच्याकडे गूगल अकाऊंट असेल, तर तुमच्याकडील सर्व डिव्हाईसची अॅक्टिव्हिटी ‘माय एक्टिविटी’ फीचरवर तुम्ही ट्रॅक करू शकतात.तुम्ही myactivity.google.com वर ही माहिती पाहू शकतात.

# फक्त १५ टक्के नागरिकांकडे पेन्शनचे योजनेचे कवच




**मुंबई :** देशात सध्या ५० कोटी नोकरदार आहेत. त्यापैकी फक्त १५ टक्के नोकरदारच पेन्शन योजनेंतर्गत मासिक बचत करीत आहेत. ३० वर्षांनी देशातील ज्येष्ठ नागरिकांची संख्या दुप्पट होणार आहे. त्यामुळे आता पेन्शन योजनेत बचत न करणाऱ्या ८५ टक्के नागरिकांना त्यावेळी काही समस्यांचा सामना करण्याची वेळ येऊ शकते, असे मत भविष्य निर्वाह निधी नियामक व विकास प्राधिकरणाचे (पीएफआरडीए) अध्यक्ष हेमंत कॉन्ट्रॅक्टर यांनी व्यक्त केले.

भारतीय उद्योग महासंघातर्फे (सीआयआय) नुकतीच विमा व पेन्शन परिषद भरवण्यात आली. त्यावेळी कॉन्ट्रॅक्टर यांनी या विषयावर मत मांडले. ते म्हणाले, सध्या देशात १३ कोटी ज्येष्ठ नागरिक (६० वर्षावरील) आहेत. २०५० पर्यंत त्यांची संख्या ३० कोटी होईल. केंद्र सरकार इंदिरा गांधी पेन्शन योजनेनुसार २.५० कोटी ज्येष्ठ नागरिकांना मासिक २०० रुपये पेन्शन देते. पण ३० कोटींना अशी पेन्शन त्यावळी देणे हे सरकारसाठी अशक्य असेल. त्यामुळे नोकरी करणाऱ्या तरुणांनी आतापासूनच पेन्शन योजनेत गुंतवणूक सुरु करणे आवश्यक आहे. सध्या असंघटित क्षेत्रात फक्त दोन ते तीन टक्के कर्मचाऱ्यांकडेच पेन्शनचे कवच आहे.

# माहुलमधील घरांची परस्पर विक्री प्रकारणी पालिका अधिकारी कारवाईच्या फेऱ्यात

**मुंबई -** शहरातील विविध प्रकल्प उभारणीदरम्यान बाधित होणाऱ्यांचे पुनर्वसन करण्यात आलेल्या माहुल गाव येथील वसाहतीमधील दोनशेहून अधिक घरांची दलालांमार्फत परस्पर विक्री करण्यात आल्याच्या प्रकरणी आता कारवाई सुरू झाली आहे. या प्रकरणी पोलिसांनी अटक केलेल्या दलालाकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे ‘एम’ पश्चिम विभागातील कर संकलक अधिकाऱ्याला अटक करण्यात आली असून येत्या काही दिवसांत आणखी अधिकाऱ्यांना अटक होण्याची शक्यता आहे.

फसवणूक झालेल्यांनी तक्रार करण्यास सुरुवात केल्यानंतर सुमारे आठ महिन्यांपूर्वी हा घोटाळा उघडकीस आला. मात्र तपासाचे गाडे जागीच रुतलेले होते. या घोटाळ्याचा वारंवार पाठपुरावा केल्यानंतर पोलिस कामाला लागले. महिनाभरापूर्वी या प्रकरणात पोलिसांनी एकाला अटक केली. त्याच्या चौकशीत पालिका अधिकारीही या घोटाळ्यास सामील असल्याचे समोर आले असून पालिकेच्या ‘एम’ पश्चिम विभागाचे कार्यालय रडारवर आहे. बारा वर्षांपूर्वी एमएमआरडीएने माहुल परिसरात शहरातील प्रकल्पग्रस्तांसाठी बारा हजार घरे बांधली होती. त्यानंतर ही सर्व घरे एमएमआरडीएने पालिकेच्या ताब्यात देण्यात आली. सध्या यातील सात हजार घरांमध्ये शहरातील नाले, रस्ते, रेल्वे आणि इतर प्रकल्पांमध्ये बाधित झालेले झोपडीधारक राहत आहेत.

पृष्ठ १ वरुन

# राष्ट्रीय दृष्टिहीन ध्वज निधी संकलन मोहिमेचे उद्घाटन

उपलब्ध करून देण्याच्या विनंतीबाबत संस्थेने राज्य निवडणूक आयोगाकडे पाठपुरावा करावा अशी सूचना राज्यपालांनी केली. ‘डिजिटल इंडिया’ अभियानात दिव्यांग व्यक्तींच्या जीवनात परिवर्तन आणण्याची क्षमता आहे असा उल्लेख करून नॅब या संस्थेने दृष्टिहीन व्यक्तींना डिजिटल इंडिया अंतर्गत रोजगारक्षम प्रशिक्षण देण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी सूचना राज्यपालांनी यावेळी केली.

सर्व महानगर पालिका, नगर परिषदा व जिल्हा परिषदांनी आपल्या अर्थसंकल्पातील पाच टक्के निधी दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणासाठी वापरावा तसेच दृष्टिहीन व्यक्तींना सवलतीच्या दरात शिवशाही बसने प्रवास करण्याची मुभा द्यावी अशी मागणी संस्थेचे अध्यक्ष रामेश्वर कलंत्री यांनी यावेळी केली. कार्यक्रमाला नॅबचे उपाध्यक्ष सूर्यभान साळुंके, मानद सचिव गोपी मयूर व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# राज्यातील ११ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या
## *संजय सेठी मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त*

**मुंबई -** राज्याच्या प्रशासकीय सेवेतील ११ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असून एमआयडीसीचे सीईओ संजय सेठी हे आता मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त म्हणून कार्यभार सांभाळणार आहेत. डॉ. कविता गुप्ता यांची सीकॉमच्या व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.



सध्या डॉ. संजय मुखर्जी हे मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त आहेत. त्यांची जागा संजय सेठी घेतील. मुखर्जी यांना वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभागाचे सचिव म्हणून नियुक्त करण्यात आलं आहे. एस एस देशमुख यांच्या निवृत्तीनंतर ते या पदाची सूत्रं स्वीकारतील.

सध्या सीकॉमचे एमडी म्हणून काम पाहणारे डॉ. के एच गोविंदा राज यांच्याकडे कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता संचालनालयाचे आयुक्तपदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

***अन्य बदल्या अशा***

अनुप कुमार यादवः आयुक्त (कुटुंब कल्याण) आणि राष्ट्रीय आरोग्य मिशनचे संचालक

परिमल सिंहः राज्याचे विशेष विक्री कर आयुक्त

डॉ. एच यशोदः महिला आणि बालविकास आयुक्तपदी

ई रवेंद्रनः महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव म्हणून नियुक्ती

एम जे प्रदीप चंद्रनः सामान्य प्रशासन विभाग उपसचिव (माहिती-तंत्रज्ञान)

डॉ. बी. एन. पाटीलः पर्यावरण विभागाच्या संचालकपदी

ए. बी धुलजः कर्मचारी राज्य विमा योजना आयुक्तपदी

पृष्ठ १ वरुन

# अमरावतीमध्ये पोलीसच असुरक्षित!

अचलपूर-परतवाडा हे जुळे शहर सर्वच बाबतीत संवेदनशील मानले जाते. शहराला लागूनच मध्य प्रदेशची सीमा आहे. गुटख्यापासून अमली पदार्थाच्या तस्करी करणाऱ्यांचा सुखेनैव संचार सुरू आहे. मद्याची रेलचेल आणि गुंडांना पोषक वातावरण तयार झाल्यास गुन्हेगारीचा आलेख सहजपणे वाढतो. पोलिसांचा भर मात्र थातूरमातूर कारवाई करण्यावर आहे. गुंडांना संरक्षण देणारी व्यवस्था उभी झाल्यास त्याचे किती वाईट परिणाम दिसून येतात, हे या जुळ्या शहराने अनुभवले आहे. गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यासाठी केले जाणारे उपाय मात्र तोकडे आहेत.

कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी २४ तास सेवेवर असलेले पोलीसच सुरक्षित नसल्याच्या घटना वाढू लागल्या आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये पोलिसांवरील हल्ल्याच्या घटना वाढल्या आहेत. तीन महिन्यांपूर्वी चांदूर रेल्वे तालुक्यातील मांजरखेड येथील भटक्या समुदायाच्या वस्तीतील गावठी दारू अड्ड्यावर छापा टाकण्यासाठी दोन पोलीस कर्मचारी गेले होते. अड्डा उद्ध्वस्त केल्यानंतर ते परत येत असताना दबा धरून बसलेल्या दारूमाफियांनी पोलिसांवर हल्ला चढवला. यात पोलीस नाईक सतीश मडावी यांचा मृत्यू झाला होता, तर सहायक पोलीस उपनिरीक्षक जाधव हे गंभीररीत्या जखमी झाले होते. अशा घटनांमुळे गुन्हेगारांवर जरब बसवणारी वर्दीच धास्तावली असून सर्वसामान्य जनतेच्या रखवाल्यांचेच संरक्षण आता कोण करणार, हा मुद्दा उपस्थित होत आहे.

जिल्ह्यातील अनेक शहरांमध्ये हॉटेल, ढाबे रात्री उशिरापर्यंत सुरू असतात. सराईत गुन्हेगार याच ठिकाणांचा आश्रय घेतात. दारू आणि अमली पदार्थाच्या नशेत धुमाकूळ घालत असतात. याच ठिकाणांहून अवैधरीत्या दारू आणि गांजाची विक्री केली जाते. गुन्ह्याच्या अनेक घटनांचे स्त्रोत ही ठिकाणे ठरत असताना पोलिसांना मात्र त्यावर अंकुश ठेवता आलेला नाही. काही शहरांमध्ये पोलीस निरीक्षक कडक असले तर रात्री सामसूम असते. अन्य ठिकाणी मात्र रात्रभर मोकळीक असल्याचे दिसते. यातून मग हप्तेबाजी, आर्थिक हितसंबंधांची चर्चादेखील सुरू होते.

गुन्हेगारीला, समाजविघातक कृत्यांना आळा घालण्यापासून रस्त्यावर वाहतुकीचे नियमन करण्यापर्यंतच्या अनेक कामांत पोलीस आणि नागरिक यांचा थेट संबंध येत असतो. अशा वेळी अनेकदा नागरिकांचे पोलिसांशी खटके उडतात, पण खाकीवर हात उचलण्याची हिंमत कुणाची होत नव्हती. मात्र गेल्या काही वर्षांमध्ये हे चित्र बदलत असून पोलीस वर्दीचा धाक कमी होत असल्याचे दिसून येत आहे. अमरावती जिल्ह्यात बऱ्याच ठिकाणी गुन्हेगारी टोळ्या असलेल्या वस्त्या आहेत. अशा वस्तींमध्ये कारवाईसाठी गेलेल्या पोलिसांना नेहमीच तेथील रहिवाशांच्या हल्ल्यांचा सामना करावा लागतो. पोलिसांच्या बाजूने कायदा सक्षम नसल्यानेच वर्दीवर हल्ले वाढले असल्याची खंत खुद्द पोलीस कर्मचारी व्यक्त करताना दिसतात. पोलिसांवर होणारे हल्ले रोखण्यासाठी कठोर कायदे कागदोपत्री आहेत. पोलिसांवर हात उचलणाऱ्यांना जामीन मिळणार नाही याचीही तरतूद करण्यात आली आहे, मात्र तरीही पोलिसांवरील हल्ल्याच्या घटना वाढतच आहेत. वाहतूक पोलिसांचा नागरिकांशी सर्वाधिक संपर्क येत असल्याने अनेकदा विसंवादाचे प्रसंग ओढावतात. अनेक वेळा आपल्यावर का कारवाई होतेय या विचाराने वाहनचालक संतापतात आणि हल्ला करतात. मद्यपान करून गाडी चालवणाऱ्यांची तपासणी करताना असे प्रकार सर्वाधिक घडतात. सुरुवातीला बाचाबाची, मग शिवीगाळ आणि मग थेट मारहाणीपर्यंत मजल पोहोचते. अशा घटना किरकोळ ठरवून त्याकडे दुर्लक्षही केले जाते. पण गेल्या तीन महिन्यांमध्ये दोन पोलिसांच्या हत्येच्या घटनांनी अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत.

## संपादकीय...



संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक

# दावा आणि कांगावा

**देशातील बँकांचे नऊ हजार कोटी रुपये बुडवून ब्रिटनमध्ये फरारी झालेल्या मल्ल्याने, पलायनापूर्वी केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांची भेट घेतल्याचा दावा केला आहे. हा दावा तातडीने खोडून जेटलींनी मल्ल्याला खोटारडे ठरविले आहे; परंतु मल्ल्याच्या वक्तव्यानंतर राजकारणाने घेतलेल्या वळणाला त्यांच्याकडे उत्तर नाही. जेटली आणि मल्ल्या यांची भेट झाली होती, असा आरोप करताना काँग्रेसचे अध्यक्ष राहुल गांधी यांनी साक्षीदारही शोधला आहे. काँग्रेसचे नेते पी. एल. पुनिया यांनी या दोघांची भेट पाहिली असल्याचे त्यांनी म्हटले आहे. मार्च २०१६मध्ये जेटली आणि मल्ल्या यांच्यात संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये पंधरा-वीस मिनिटे भेट झाल्याचे सांगताना पुनिया यांनी 'सीसीटीव्ही'ची चित्रफीत तपासण्याची सूचनाही केली आहे. एका गुन्हेगाराची भेट जेटली यांनी घेतलीच कशी, असा सवाल करताना राहुल यांनी त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. मल्ल्याने पलायन केल्यानंतर या भेटीची कल्पना जेटली यांनी पोलिसांना आणि तपास यंत्रणांना का दिली नाही, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला आहे. भाजपचे प्रवक्ते संबित बात्रा यांनी प्रत्यारोपाची तोफ डागताना राहुल आणि गांधी परिवाराला लक्ष्य केले आहे. मल्ल्या याच्या 'किंगफिशर एअरलाइन्स'मधून संपूर्ण गांधी कुटुंबाने मोफत हवाई प्रवास केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. काँग्रेस प्रणीत संयुक्त पुरोगामी आघाडी (यूपीए) सरकारने मल्ल्याशी सौदेबाजी केल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. आरोप-प्रत्यारोपांच्या या खेळात मल्ल्याचा मूळ मुद्दा बाजूला राहण्याचीच शक्यता आहे. बुडीत कर्जाबाबत परस्परांना लक्ष्य करण्याच्या भाजप आणि काँग्रेस यांच्या खेळीने रघुराम राजन यांनी केलेल्या महत्त्वाच्या सूचनांकडे दुर्लक्ष झाले आहे; तेच या बाबतीतही घडत आहे. मल्ल्या हा आर्थिक गुन्हेगार असून, तो ब्रिटनमध्ये उजळ माथ्याने वावरतो आहे. उद्योग, राजकारण, करमणूक आणि खेळ या सर्वच क्षेत्रांत वावरत साम्राज्य उभारणारा मल्ल्या एके काळी अनिभिषिक्त सम्राट होता आणि सर्वच पक्षांचे नेते त्याला पावन करून घेत होते. निवडून न येणाऱ्या नेत्यांची; तसेच आर्थिक हितसंबंध असणाऱ्या उद्योगपतींची वर्णी राज्यसभेवर लावण्याची पद्धत आपल्याकडे चांगलीच रुजली आहे. याचाच लाभ उठवून मल्ल्या एकदा नव्हे तर दोनदा संसदेच्या वरिष्ठ सभागृहात जाऊन पोचला. काँग्रेस, भाजप, धर्मनिरपेक्ष जनता दल (जेडीएस) या पक्षांचा पाठिंबा मिळवूनच तो खासदार झाला. मल्ल्याचे व्यक्तिमत्त्व वादग्रस्त असूनही सर्वपक्षीय नेते त्याच्या विमानातून प्रवास करीत होते. त्यामुळे त्याच्याशी संबंध असल्याच्या मुद्द्यावरून आरोप-प्रत्यारोप करण्यात काहीही अर्थ नाही. राजकारण्यांशी संधान साधून किंवा स्वतः राजकारणात जाऊन आपल्या उद्योगांसाठी सरकारी बँकांकडून कर्जपुरवठा मंजूर करून घेणे, कर्जफेडीच्या मुदत पुनःपुन्हा वाढवून घेणे, थकबाकी वाढल्यानंतर सबबी सांगत तडजोडीचा आग्रह धरणे किंवा चक्क पलायन करणे असा प्रकार अनेक बड्या धेंडांकडून घडत आहे. मल्ल्या त्यांपैकी एक. मल्ल्याला परत आणून, त्याच्याकडून पैशांची वसुली करण्याबरोबरच असे प्रकार पुन्हा घडू नयेत, यासाठी दोष निवारणाचीही आवश्यकता आहे. स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडोदा, पंजाब नॅशनल बँक आदींसह सतरा बँकांना मल्ल्या नऊ हजार कोटी रुपये देणे आहे. याशिवाय आपल्या कर्मचाऱ्यांचा भविष्यनिर्वाह भत्ता त्याने थकविला आहे. करचुकवेगिरीही केली आहे. यामुळे बँका, प्राप्तिकर खाते, अंमलबजावणी संचालनालय आदी त्याच्या मागे लागलेले आहेत. त्याच्या गुन्ह्यांची चर्चा होऊ लागल्यानंतर राज्यसभेच्या नैतिक समितीने त्याचे सदस्यत्व रद्द केले. त्यानंतर तपास यंत्रणांच्या नाकावर टिच्चून मल्ल्या देशाबाहेर गेला. दोन वर्षांहून अधिक काळ तो ब्रिटनमध्ये असून, तिथे राजरोसपणे वावरत आहे, मेजवान्या झोडत आहे. त्याला भारतात परत आणण्यासाठी सरकारकडून प्रयत्न जरूर होत आहेत. त्याच्या प्रत्यार्पणासाठी ब्रिटनच्या वेस्टमिन्स्टर कोर्टात सुनावणी सुरू असून, त्या दरम्यानच मल्ल्याने जेटलींना भेटल्याचा दावा केला आहे. आपल्या विरोधात कारवाई होणार याची 'टीप' मिळाल्यानंतरच त्याने पलायन केल्याची वदंता आहे. त्याच संदर्भात पत्रकारांनी प्रश्न केला असता, मल्ल्याने जेटलींच्या भेटीचा उल्लेख केला आणि बँकांबरोबरील प्रकरणातील तोडगा काढण्यासाठी त्यांना भेटल्याचा दावा केला. मल्ल्याच्या दाव्यात कितपत तथ्य आहे हे तपासून पाहतानाच, त्याच्यावरील ब्रिटनमधील खटला गतिमान करण्यासाठी पावले उचलण्याची गरज आहे. केवळ ब्रिटनच नव्हे, तर अन्य देशांशी प्रत्यार्पणाबाबत सकारात्मक बदल घडवून आणण्याचीही आवश्यकता आहे. यासाठीही काँग्रेसने सरकारकडे आग्रह धरायला हवा.**



*(क्रमशः)*

# 'ग्रीन फील्ड प्रकल्प' म्हणजे जनतेची दिशाभूल

'वातावरण बदल' व तापमानवाच्या गंभीर समस्येत मुख्य वाटा खाजगी मोटारींचा आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने जर्मनीतील 'बॉन' येथे घेतलेल्या जागतिक परिषदेत दि. ६ नोव्हेंबर २०१७ रोजी, मानवजात व जीवसृष्टीच्या अस्तित्वाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची घोषणा केली. 'ती म्हणजे तापमानवाअपरिवर्तनीय झाली आहे.' आता एव्हकार्बन वातावरणात जमा झाला आहे की, त्याच्या उष्णता शोषून घेण्याच्या गुणधर्मामुळे तापमान सतत वाराहणार आहे. ही गति गेल्या तीन वर्षांपासुन, दर वर्षी पृथ्वीच्या सरासरी तापमानात २° से (एक पंचमांश) अशी अकल्पनीय व धक्कादायक आहे. पॅरिस करारात यंत्र येण्याच्या म्हणजे सन १७५० च्या तुलनेत, मानवजात वाचवण्याच्या दृष्टीने धोकादायक ठरवलेली २° से ची वाफक्त येत्या तीन वर्षांत होत आहे. ही पृथ्वीवरील आणिबाणीची स्थिती आहे.

'आता होत असलेले थोडेही कार्बनचे उत्सर्जन व थोडाही हरितद्रव्याचा नाश मानवजातीचे पृथ्वीवरून कायमचे उच्चाटन घडवणार आहे.' ती प्रक्रिया सुरू झाली आहे. केरळ दुर्घटनेतील मृत्यु हा त्याचा भाग आहे. मानवजात वाचवण्यासाठी, कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी पॅरिस करारावर सही करणारे मोदी, त्याविरूध्द जाणार्या मोटार व रस्त्यांना प्रोत्साहन देत आहेत. आर्थिक धोरणावरून, त्यास मानवी चेहरा असावा म्हणून त्यांच्या सरकारशी मतभेद असणारे रघुराम राजन व अमर्त्य सेनांसारखे नामवंत अर्थतज्ञही भौतिक विकासाबाबत मात्र तीच रूळलेली वाट घेतात. विरोधक फार तर, हा विकास व आर्थिक वारोजगारहीन (jobless growth) असल्याचे म्हणत आहेत. ती रोजगारासह झाली तरी चूकीची ठरेल हे कुणाच्या लक्षात येत नाही. जीडीपी, औद्योगिक रोजगारवायांचे पृथ्वीशी वाकडे आहे. आपण पृथ्वीच्या क्षमतांमुळे जगतो, रोजगारामुळे नाही. प्रत्येकाने हे स्वतःला जाणवून देणे जरूर आहे की पूर्ण पृथ्वी हेच नाविकास क्षेत्र होते व आहे.

मोटारनिर्मितीचे माहेरघर असलेला, अनेक शोधांची जननी असलेला 'जर्मनी' हा देश मोटारविरोधी धोरणे राबवत आहे. त्यासाठी नुकताच जर्मनीने उत्कृष्ट सार्वजनिक वाहतुक सेवा सर्व नागरिकांना मोफत देण्याचा निर्णय घेतला. ङगांधी, विवेकानंदांचा भारत मात्र आपले सहस्त्रकांचे शहाणपण व साधेपण सोडून, प्रतिष्ठेच्या व समृध्दीच्या खोट्या अशाश्वत कल्पना मनात बाळगून शहरी व ग्रामीण भागातही मोटारींचा सुळसुळाट करत आहे.ङ त्यासाठी कोकणासारख्या रिफायनर्या वायाच्या प्रयत्नात आहे.

विकास आणि भ्रष्टाचार हातात हात घालून जातात असा अनुभव बहुतेक वेळा येतो. रस्ते, बांधकामे अल्पकाळात निकामी होतात, खड्डे पडतात. पण पैशाचा भ्रष्टाचार नसता तरी भौतिक विकास योग्य ठरत नाही. या सर्व प्रश्नाकडे आर्थिक दृष्टीकोनातून पाहिले जाते. नागरिक किंवा सरकार पैसे खर्च करू शकतात की नाही इतकाच विचार होतो. मग गडकरी म्हणतात की, पैशाची कमी नाही. पैसे आहेत म्हणून पृथ्वीच्या संसाधनांची, जडणघडणीची हानी करण्याचा आपल्याला अधिकार नाही. पैसा आहे म्हणून सरकारने रस्ते बांधायचे, नागरिकांनी कार घ्यायच्या, हे थांबले पाहिजे. तुमचा पैसा, रसायने व यंत्र हे पृथ्वीवरील जीवनासाठी म्हणजे पर्यायाने तुमच्यासाठी संकट आहे. यांना पैशाची कमी नसेल पण मानवजातीला पृथ्वीची कमी आहे. व ती गोष्ट निर्णायक आहे.

अण्णा हजारे व इतर सज्जनांना पैशाचा अपहार हा भ्रष्टाचार म्हणून खटकतो. पण त्यापेक्षा भयंकर गंभीर असे मानवजात संपुष्टात आणणारे भौतिक विकासरूपी भ्रष्ट आचरण लक्षातही येत नाही. या दृष्टीने समाज प्रचंड मागासलेला आहे. केवळ पैसे छापून सरकार, उद्योग व नागरिकही, आपले अस्तित्व काही दशकांत संपवणार असलेल्या मोटार, वीज व सीमेंटसारख्या उत्पादनांचा मनमानी वापर करत आहेत. तरूणांना बहकवले गेले आहे. पेट्रोल, डिझेलचे दर कमी करावे अशी मागणी विशेषतः तरूणांकडून होते. आपण फार भाग्यवान असून तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आधीच्या पियांनी न भोगलेले सुख भोगत आहोत अशी उन्माद आणणारी, बेभान बनवणारी मानसिकता अर्थव्यवस्थेच्या सूत्रधारांकडून प्रसारमाध्यमांचा वापर करून पध्दतशीरपणे घडवली गेली आहे. बहुतेक सगळे संपादक हे औद्योगिकरणाचे समर्थक असावे अशी व्यवस्था आहे.

तेलाबाबत आंतरराष्ट्रीय बाजार व भारतीय किंमतीत मोठी तफावत आहे. हे लाखो कोटी रूपये पायाभूत संरचनेसाठी खर्च करत असल्याची सारवासारव सरकार करते. पण ही संरचना निर्मिती पृथ्वीवरील मानवजात व जीवसृष्टीचा पाया खचवत आहे.

पेट्रोल डिझेलचे दर परवडत नाहीत म्हणून सायकल वापरण्यापेक्षा, विनाश टाळण्यासाठी स्वेच्छेने ती वापरली पाहिजे. नुकत्याच जपानमधे आलेल्या वादळाकडे पाहिले तर परिस्थिती सायकलच्याही पलिकडे गेली आहे.

पृथ्वीचे सरासरी तापमान सन १७५० च्या तुलनेत १४° से ने वाअसल्याने शंभर नव्हे तर हजारो वर्षांत न पडणारा पाऊस केरळमधे पडला. पावसाच्या नोंदी ठेवणे सुमारे शंभर वर्षांपूर्वी सुरू झाले. मात्र पाऊस करोडो वर्षे पडत आहे. आताच्या मानवनिर्मित नैसर्गिक दुर्घटनांना तोंड देणे तंत्रज्ञानाची प्रौमिरवणार्या अमेरिका व जपानलाही शक्य होत नाही, तेथे आपल्या देशाची काय कथा. तेथील सीमेंटचे रस्ते व बांधकामे खेळण्यांप्रमाणे फेकली जात आहेत. उध्वस्त होत आहेत. केरळातील अतिवृष्टीत गेल्या काही दशकांत बांधलेले सोळा हजार किलोमीटर लांबीचे रस्ते, काही दिवसांतच उखडले गेले. आता मानवाने निसर्गापुमाघार घेण्यात शहाणपणा आहे. सीमेंटचे किंवा युटीडब्लुटी चे रस्ते बांधले तरी ते टिकणार नाहीत. 'रस्त्यांचा अभाव हे भारतीयांचे मागासलेपण नव्हते. ते त्यांच्या शहाणपण व स्वयंपूर्णतेचे निदर्शक होते.' सीमेंटच्या प्रत्येक रस्ताबांधणीबरोबर आपण मानवजातीच्या उच्चाटनावर शिक्कामोर्तब करत आहोत. ङप्रस्थापितांच्या अज्ञानाने घातलेला विज्ञानाचा मुखवटा टराटरा फाडण्याची गरज आहे.

सीमेंटचे रस्ते दीर्घकाळ टिकतात व खड्डेमुक्त असतात ही केवळ सबब आहे. तसे ते नसतात, आणि ते असते तरी तापमानवामानवजात वाचवण्यासाठी, त्यांची निर्मिती थांबणे आवश्यक आहे. पण या क्षेत्रात उच्चशिक्षितही निरक्षर आहेत. त्यांना तसे ठेवले गेले आहे.

डेंग्यूमुळे एका मुलाचा मुत्यू व त्यानंतर त्याच्या आईवडिलांनी केलेली आत्महत्या याची दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने घन कचऱ्याच्या विक्राळ रूप घेणाऱ्या समस्येमुळे महाराष्ट्र व काही राज्यांत संबंधित यंत्रणांनी उपाययोजना सादर करेपर्यंत बांधकामांस बंदी घालण्याचा निर्णय घेतला.

पण प्रचलित विकास कल्पना मान्य केली तर ही बांधकामे व पर्यायाने कचरा होत राहणार.

'आजची सर्व बांधकामे व औद्योगिक वस्तुनिर्मिती हा उद्याचा कचरा आहे हे लक्षात आले तर या प्रयत्नांमधील फोलपणा समजेल.' गेल्या वर्षी देशात वायूप्रदूषणामुळे २५ लाख माणसे मरण पावली. याची व नद्या, तळी, सागर, भूजल प्रदूषित करणाऱ्या द्रवप्रदूषणाची अशी वेगवेगळी दखल कशी घेणार? ही औद्योगिकरण, शहरीकरण व अर्थव्यवस्थेची एकच प्रक्रीया आहे. असे असताना हजारो प्रकल्पांची निर्मिती देशात चालू आहे. ते मानवजातीला निःसंशयपणे पृथ्वीवरून नष्ट करण्याची वाटचाल घडवत आहेत. त्यांना प्रतिष्ठा कशासाठी? ङऔद्योगिकरण ही कचरानिर्मिती आहे. शहर हाच कचरा आहे.' 'पृथ्वीच्या कोट्यावधी वर्षांच्या शाश्वत टिकणार्या प्रदूषण व कचरारहित अप्रतिम व्यवस्थेत हे न बसणारे आहे.'

औद्योगिकरण, शहरीकरण व प्रचलित अर्थव्यवस्था यांचा त्याग केल्याशिवाय ही समस्या सुटणार नाही. आधीच एव्हविघातक कचरा पृथ्वीच्या चारही आवरणांत सोडला आहे की त्याचे निराकरण आता शक्य नाही. हे तात्काळ थांबवावे लागेल. नाहीतर आपला विनाश अटळ आहे.

**- ॲड. गिरीश राऊत**

# पावसाळा अद्याप संपलेला नसताना दिव्यात पाण्यासाठी रांगा

**ठाणे** - पावसाळा अद्याप संपलेला नसताना दिव्यात तीव्र पाणीटंचाईचे ढग दाटून आले आहेत. ऐन गणेशोत्सवात नागरिकांना पाण्यासाठी तासन्तास रांगेमध्ये उभे रहावे लागत आहे. दिवा पश्चिमेतील एनआर नगर, नागवाडी, शनिवार वाडा, क्रिश कॉलनी आणि गावदेवी मंदिर परिसरातील सुमारे शंभराहून अधिक इमारती आणि चाळींमध्ये राहणारे नागरिक शुक्रवारी एक गॅलन पाण्यासाठी तीन ते चार तास रांगेमध्ये ताटकळत उभे होते. एकीकडे गणेशोत्सवाच्या दीड दिवसाच्या विसर्जनासाठी नागरिकांची लगबग सुरू असताना दिव्यातील चार नळांवर शेकडो नागरिकांचा एक गॅलन पाण्यासाठी संघर्ष सुरू होता.



दिवा रेल्वे स्थानकाच्या पश्चिमेकडील भागात टोलेजंग इमारती दिसत असल्या तरी या इमारतींमधील शेकडो नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. उन्हाळ्यामध्ये पाण्यासाठी संघर्ष करणाऱ्या येथील रहिवाशांना पावसाळ्याचे चार महिने संपण्यापूर्वीच पुन्हा रस्त्यावर येऊन पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे गेल्या सात ते आठ वर्षांपासून येथील नागरिक रेल्वे गाड्यांतून मुंब्रा स्थानक गाठून पाणी आणत होते. परंतु गेल्या वर्षी या भागात महापालिका प्रशासनाने तीन ते चार सार्वजनिक नळांची व्यवस्था केली आहे. परंतु या नळांची संख्या कमी असल्याने येथे पाणी भरणाऱ्यांची संख्या शंभर ते दोनशेहून अधिक असते. मुंब्र्याचा धोकादायक प्रवास काहीसा थांबला असला तरी रांगांमधील प्रतीक्षा अद्याप संपलेली नाही. शुक्रवारी सकाळपासून या नळांवर पाण्यासाठी उन्हाळ्यासारखी गर्दी होती. सायंकाळी ती अधिक वाढत गेली. सुमारे तीन ते चार तास ताटकळत बसल्यानंतर पाण्याचे अवघे दोन गॅलन मिळत असल्यामुळे नागरिकांच्या संयमाचा बांध फुटत होता. परंतु रांगेशिवाय पर्याय नसल्यामुळे नागरिक या रांगांची शिस्त पाळताना दिसत होते.

### पालिका अधिकारी ढिम्म

*पश्चिमेकडील सुमारे पंधरा ते वीस हजार नागरिकांना या पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून महापालिका प्रशासनाकडून या भागातील समस्येकडे दुर्लक्ष केले जात आहे. उन्हाळ्यामध्ये होणारा हा त्रास पावसाळ्यातही होतो हे अत्यंत गंभीर आहे. उपविभागीय अभियंत्यांकडे या संदर्भात वारंवार तक्रार केल्यानंतरही परिस्थिती जैसे थे आहे. एकीकडे गणेशोत्सव साजरा करत असताना दिव्यातील या भागातील नागरिकांच्या घशाला कोरड पडली आहे.*

### प्रत्येक थेंबासाठी संघर्ष

*यंदा धरणक्षेत्रामध्ये जोरदार पाऊस लागल्यामुळे धरणे फुल्ल असून शहरवासीयांना पाण्याची टंचाई जाणवणार नसल्याचे बोलले जात आहे. परंतु ठाणे महापालिकेचा भाग असलेल्या दिवा परिसरात मात्र पाण्यासाठीच्या रांगा अद्याप कायम आहेत. एकाच ठिकाणी नळ उपलब्ध असून पर्यायी व्यवस्था नसल्यामुळे इथेच नागरिकांची गर्दी उडते. या भागातील नळांची संख्या वाढवल्यास गर्दी कमी होऊ शकते. परंतु अनेक वर्ष मागणी करूनही परिस्थिती जैसे थे आहे. त्यामुळे प्रत्येक थेंबासाठी येथील नागरिकांना संघर्ष करावा लागत आहे.*

# मंडप नियमांच्या चौकटीत!

सार्वजनिक उत्सवांच्या मंडपांसाठी रस्त्यावर खड्डे खोदले तर प्रत्येक खड्ड्यामागे दोन हजार रुपये दंड भरण्याची तंबी महापलिका प्रशासनाने उत्सव मंडळांना दिली असून दंडात्मक कारवाईच्या भीतीने शहरातील अनेक गणेशोत्सव मंडळांनी यंदा खड्डेविरहित मंडप उभारल्याचे चित्र दिसून येत आहे. लोखंडी खांबांचा वापर करून हे मंडप उभारण्यात आले आहेत. तर मंडपाच्या परिसरात विद्युत रोषणाईसाठी खड्डे खोदण्याऐवजी वाळूने भरलेल्या स्टीलच्या डब्यांचा वापर केला आहे. इतकेच नव्हे तर दरवर्षी निम्याहून अधिक रस्ता व्यापणाऱ्या गणेश उत्सव मंडळांनी यंदा मात्र पालिकेच्या नियमावलीनुसार मंडप उभारणी केली असून त्यामुळे शहरातील रस्ते अडविण्याचे प्रमाणही कमी झाल्याचे दिसून येते.



सार्वजनिक उत्सवांसदर्भात धोरण ठरविण्याचे निर्देश उच्च न्यायालयाने एका याचिकेच्या सुनवाणीदरम्यान महापालिकांना दिले होते. त्यानुसार ठाणे महापालिका प्रशासनाने सार्वजनिक उत्सवांसाठी नियमावली तयार केली आहे. या नियमावलीनंतरही शहरात अनेक ठिकाणी ठरवून दिलेल्या नियमापेक्षा जास्त मंडप उभारून रस्ता अडविला जात होता. त्याचप्रमाणे उत्सवाच्या मंडपासाठी रस्त्यावर खड्डे खोदले जात होते. अशा मंडळांवर महापालिकेकडून कारवाई केली जात होती. रस्त्यावर खड्डे खोदले म्हणून काही मंडळांवर दंडात्मक कारवाई केली होती. त्यानंतही शहरात खड्डे खोदण्याचे प्रकार सुरू होते. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गेल्या महिन्यात महापालिकेत मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत महापालिका प्रशासनासह लोकप्रतिनिधींनी नवे तंत्रज्ञान वापरून खड्डेविरहित मंडप उभारण्याच्या सूचना मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना केल्या होत्या. त्याचबरोबर उत्सवाच्या मंडपासाठी रस्त्यावर खड्डे खोदले तर प्रत्येक खड्ड्यामागे दोन हजार रुपये दंड वसुल केला जाईल, अशी तंबीही महापालिकेने मंडळांना दिली होती.

# स्कायवॉकवर पादचाऱ्यावर प्राणघातक हल्ला

**कल्याण :** नेहमीच वादात असलेला कल्याणचा स्कायवॉक पादचाऱ्यांसाठी त्रासदायकच नव्हे, तर धोकादायकही झाला आहे. या स्कायवॉकवर वावरणाऱ्या शरीरविक्रय करणाऱ्या महिला आणि तृतीय पंथीयांकडून पादचाऱ्यांना लुबाडून त्यांच्यावर हल्ले करण्याच्या घटना वाढू लागल्या आहेत. या स्कायवॉकवरून जात असलेल्या एकट्या तरुणाला हेरून त्याच्यावर ब्लेडने वार करत त्याला जखमी केल्याची घटना गुरुवारी सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

कोट्यवधी रुपये खर्चून नागरिकांच्या सोयीसाठी उभारण्यात आलेल्या कल्याण पश्चिमेकडील स्कायवॉकला फेरीवाल्यांनी गराडा घातला आहे. यामुळे ऐन गर्दीच्या वेळी नागरिकांना या फेरीवाल्यांच्या गर्दीतून मार्ग काढण्याचे दिव्य पार पाडावे लागत असताना गेल्या काही महिन्यांपासून शरीरविक्रय करणाऱ्या महिला व तृतीय पंथीयांचा वावर वाढला आहे. त्यांच्याकडून लूटमार होण्याच्या घटनाही घडतात. त्यांची टोळीच कार्यरत असून या टोळीतील महिला अश्लील इशारे करत पोलिस ठाण्यात तक्रार देण्याची धमकी देऊन त्यांच्याकडील पैसे व किमती सामान लुटतात, असे नागरिकांचे म्हणणे आहे. काही दिवसांपूर्वी या प्रकारांचा व्हीडिओ सोशल मीडियावर व्हायरल करत लोकप्रतिनिधी, सरकार आणि पोलिसांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र त्याने फारसा फरक पडलेला नाही. यानंतर गुरुवारी सोशल मीडियावर एक फोटो व्हायरल झाला असून यात जखमी तरुणाने आपल्याला मारहाण किमती वस्तू आणि पैसे लुटल्याचे म्हटले आहे. तरुणाने पोलिसांकडे तक्रार करण्याचा प्रयत्न केला मात्र पोलिसांनी कारवाई केली जाईल, असे उत्तर देत या तरुणाला परत पाठवले.



# टँकरमुळे आणखी एकाचा बळी

## *नालासोपाऱ्यात अपघातात तरुणाच्या मृत्यूनंतर जमावाचा रास्ता रोको; प्रशासनाचे दुर्लक्ष*

गणेशमूर्ती आणण्यासाठी निघालेल्या एका तरुणाला नालासोपाऱ्यात एका टँकरने धडक दिल्याने त्याचा मृत्यू झाला. अतिवेगाने जाणाऱ्या टँकरमुळे गेल्या वर्षभरात अनेक अपघात झाले असतानाही टँकरचालकांवर कारवाई करण्यास प्रशासन असमर्थ ठरत असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. सातत्याने अपघात होत असल्याने संतप्त जमावाने नालासोपाऱ्यात रास्ता रोको केला. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी लाठीमार केला असून त्यामुळे काही जण जखमी झाले आहेत. नालासोपारात पूर्वेतील धानीव बाग परिसरात गणेशमूर्ती आणण्यासाठी कमलाकर बिंद नावाचा तरुण आपल्या मुलासोबत निघाला होता. रस्त्यावरून जात असताना अतिवेगाने आलेल्या एका टँकरने त्याला जोरदार धडक दिली. या दुर्घटनेत कमलाकरचा जागीच मृत्यू झाला. या दुर्घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण पसरले. आतापर्यंत टँकरच्या धडकेत अनेकांचा जीव गेला असतानाही महापालिका प्रशासन टँकरचालकांकडे दुर्लक्ष करते, असा आरोप करून स्थानिकांनी रास्ता रोको केला आणि परिसरामध्ये तोडफोड करण्यास सुरुवात केली.



# पोलिस ठाणे, वसाहतीचा मार्ग मोकळा

**अंबरनाथ** - अंबरनाथ पश्चिम भागात असलेले पोलिस ठाणे आणि सहाय्यक पोलिस आयुक्त कार्यालयाचा पूर्णविकास करून नवीन इमारत बांधण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. गृह राज्यमंत्री डॉ. रणजीत पाटील यांच्यासोबत झालेल्या बैठकीत पोलिस ठाण्याच्या प्रशासकीय इमारतीसह पोलिस कर्मचाऱ्यांच्या वसाहतीच्या जागेवर २५ मजल्यांच्या सुसज्ज दोन इमारती उभारण्याच्या कामाला त्यांनी मंजुरी दिली आहे. या इमारतींत २४४ सदनिका तयार केल्या जाणार आहेत.

अंबरनाथ पश्चिम भागात असलेल्या पोलिस ठाण्याच्या इमारतीला जवळपास ४० वर्षे झाली आहेत. याच इमारतीच्या एका बाजूला सहाय्यक पोलिस आयुक्त यांचेही कार्यालय आहे. पोलिस ठाण्याच्या मागील बाजूस पोलिस कर्मचाऱ्यांची मोठी वसाहतही आहे. मात्र गेल्या काही वर्षांपासून पोलिस ठाण्याची इमारत आणि सहाय्यक पोलिस आयुक्त कार्यालय यांचे बांधकाम जीर्ण झाले आहे. या ठिकाणी नवीन इमारतीच्या उभारणीबाबत आमदार डॉ. बालाजी किणीकर सातत्याने पाठपुरावा करत होते. पोलिस ठाणे, सहाय्यक पोलिस आयुक्त कार्यालय आणि पोलिस कर्मचारी वसाहत यासाठी गृहनिर्माण महामंडळाकडून ध्रुव कन्सल्टन्सीने ऑक्टोबर २०१७मध्ये बांधकाम परवानगीचा प्रस्ताव अंबरनाथ नगरपालिकेकडे सादर केला होता. त्यासाठी आवश्यक शुल्कदेखील महामंडळाकडून नगरपालिकेकडे भरले होते. मात्र नगरपालिकेने नवीन विकास आराखड्यानुसार कल्याण-बदलापूर या रस्त्याची रूंदी वाढत असल्याचे कारण देत इमारतींची उंची कमी करत नवीन आराखडा सादर करण्याची सूचना केली. या आराखड्यानुसार सदनिकांची संख्या कमी होत होती. त्यामुळे कायमस्वरूपी पोलिस कर्मचाऱ्यांना अधिक घरे उपलब्ध व्हावीत, यासाठी गृह राज्यमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीत पोलिस ठाणे आणि कर्मचारी वसाहतीच्या पूर्णविकास करत या ठिकाणी सुसज्ज अशा दोन इमारती उभारण्यास पाटील यांनी मंजुरी दिल्याची माहिती किणीकर यांनी दिली. बांधकाम मंजुरी मिळण्यासाठी आराखडा तत्काळ नगरपालिकेकडे सादर करण्याचे आदेश गृहनिर्माण महामंडळाचे अधिक्षक अभियंता खोत आणि संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

# पेट्रोल ८९ तर डिझेल ७८ पार

## सततच्या दरवाढीने सर्वसामान्य बेजार

**नवी दिल्ली -** पेट्रोल-डिझेल वाढत्या दरांमुळे सर्वसामान्य जनता महागाईने होरपळू लागली आहे. मात्र, प्रशासन ही दरवाढ सर्वस्वी तेल कंपन्यांकडून होत असल्याचे सांगत वेळ मारून नेत आहे. 'अच्छे दिन' हेच का? असा सवाल सामान्य नागरिक विचारू लागले आहेत. इंधनाच्या दरवाढीने नागरिकांच्या संतापाचा भडका उडाला आहे. पेट्रोल, डिझेलच्या किंमतीत दिवसेंदिवस अधिकच वाढ होत असून मुंबईत पेट्रोलच्या दराने उच्चांक गाठला आहे. मुंबईत शनिवारी (१५ सप्टेंबर) पेट्रोल ३४ पैसे प्रति लिटर आणि डिझेल २४ पैसे प्रति लिटर महाग झाले आहे. यामुळे मुंबईत आजचा पेट्रोलचा प्रति लिटर दर ८९.०१ तर डिझेलचा प्रति लिटर दर ७८.०७ झाला आहे.



राजधानी दिल्लीत पेट्रोल ३५ पैसे तर डिझेल २४ पैशांनी प्रति लिटरमागे महाग झाले आहे. यामुळे दिल्लीमध्ये पेट्रोलसाठी एका लिटरमागे ८१.६३ रुपये तर डिझेलसाठी प्रति लिटर ७३.५४ रुपये नागरिकांना मोजावे लागत आहे.

# मल्ल्या एक नंबरचा खोटारडा, दारुड्यांवर आणि खोटारड्यांवर विश्वास ठेवू नये - उद्धव ठाकरे



**केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली आणि विजय मल्ल्या भेटीवरुन सध्या जोरदार टीकास्त्र सुरु असताना शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी अरुण जेटलींची पाठराखण केली आहे. केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांना आपण भेटलो हे मल्ल्याने इतक्या वर्षानंतर कोर्टात सांगितले. काँग्रेसला या भेटीची कल्पना होती मग ते इतकी वर्षे दडवून का ठेवले, की काँग्रेसचा आणि मल्ल्याचा बोलविता धनी कुणी वेगळाच आहे? असा सवाल उद्धव ठाकरे यांनी विचारला आहे. एकमेकांचे पाय कापण्याचे प्रयोग दिल्लीत सुरू आहेत. २०१९ ची ही पूर्वतयारी आहे. जे नकोत त्यांना आताच छाटा. त्यात सुक्याबरोबर ओलेही जळत आहे. जेटली यांच्याबाबत नेमके तेच घडताना दिसत आहे असं उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे.**

विजय मल्ल्या एक नंबरचा खोटारडा आहे. दारुड्यांवर आणि खोटारड्यांवर विश्वास ठेवू नये, पण विजय मल्ल्या याने लंडन कोर्टात केलेल्या एका वक्तव्यावरून केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली अडचणीत आले आहेत. देश सोडण्यापूर्वी आपण अरुण जेटली यांना भेटलो होतो. या भेटीत आपण बँकेच्या व्यवहाराबाबत तडजोड करण्याविषयी बोललो असा दावा विजय मल्ल्या याने लंडनच्या एका कोर्टात केला. यावर अरुण जेटली यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचे कारण काय? पण काँग्रेसने हे केले आहे असं उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे.

मल्ल्या हा आता आर्थिक विषय राहिला नसून राजकीय धोपटेगिरीचा विषय झाला आहे. मल्ल्याने आता लंडनच्या कोर्टात सांगितले की, "बँकांचे आपल्यावर कर्ज होते. थकबाकी भरायला आपण तयार होतो. तडजोडीबाबत मी बँकांना अनेकदा पत्र लिहिले होते, परंतु मला त्यांच्याकडून काहीच प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे बँकांशी तडजोड करावी यासाठी आपण अर्थमंत्र्यांची भेट घेतली होती." मल्ल्याच्या या विधानानंतर इतकी खळबळ उडायचे कारण काय? अशा प्रकारच्या भेटी होऊ शकतात व हे काँग्रेसला माहीत असायला हवे. ज्या पक्षात मनमोहन सिंग यांच्यासारखे जोरदार अर्थतज्ञ आहेत त्यांचा सल्ला तरी काँग्रेसने घ्यायला हवा होता असं मत उद्धव ठाकरेंनी व्यक्त केलं आहे.

तडजोडीचा मसुदा मल्ल्याने दिला होता व बँकांना तो मान्य नव्हता. त्यामुळे अर्थमंत्र्यांकडे दाद मागितली असे हे प्रकरण आहे. पुन्हा मल्ल्या अर्थमंत्र्यांना भेटला तो संसदेच्या दालनात. मल्ल्या हा खासदार होता व खासदार म्हणून तो संसदेत कुठेही वावरू शकत होता. संसद सदस्याचा तो हक्क आहे. त्यामुळे संसदेच्या मध्यवर्ती सभागृहात आपण मल्ल्या याला अरुण जेटली यांच्याशी बोलताना पाहिले होते, म्हणून जेटली हे मल्ल्या प्रकरणातील एक गुन्हेगार आहेत असे जेव्हा काँग्रेसचे एक पुढारी पुनिया सांगतात तेव्हा हसू आवरत नाही असा टोला उद्धव ठाकरेंनी लगावला आहे.

खरे तर काँग्रेस व भाजपने संसदेत ज्या चारित्र्याचे लोक निवडून आणले आहेत ते पाहता मंत्र्यांनी कुणाला भेटायचे व टाळायचे हा एक प्रश्नच आहे. पुन्हा मल्ल्या हा कर्ज बुडवणारा एकटा नाही. संसदेत असे कर्जबाजारी व कर्जबुडवे 'एक से बढकर एक' आहेत व ते खासदार म्हणून हवे तेथे फिरत आहेत अशी टीका उद्धव ठाकरेंनी केली आहे.

# मोदी म्हणाले, चार वर्षात केली ६० वर्षांची सफाई...

नवी दिल्ली : गेल्या ६० -७० वर्षात जे झाले नाही, ते चार वर्षात स्वच्छता अभियानातून करून दाखवले. चार वर्षांपासून सुरू झालेल्या स्वच्छतेच्या अभियानाला देशातील प्रत्येक नागरिकांनी पाठिंबा दिला आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले. 'स्वच्छता हीच सेवा' या अभियानात संबोधित करताना ते बोलत होते. यावेळी नरेंद्र मोदी यांनी सर्वसामान्य जनतेसह बॉलिवूडमधील अभिनेते अमिताभ बच्चन, उद्योगपती रतन टाटा आणि अध्यात्मिक गुरु जग्गी वासूदेव यांच्याशी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद साधला.



चार वर्षांपासून सुरू झालेल्या स्वच्छतेच्या अभियानाला देशातील प्रत्येक नागरिकांनी पाठिंबा दिला आहे. देशात ४० टक्के स्वच्छता होती. ती आता ९० टक्क्यापर्यंत पोहोचली आहे. गेल्या ६० -७० वर्षात जे झाले नाही, ते चार वर्षात स्वच्छता अभियानातून करुन दाखविले आहे. आतापर्यंत ४५० जिल्ह्यांसह २० केंद्र शासित प्रदेश हागणदरीमुक्त झाले आहेत. फक्त शौचालये बनवल्याने भारत स्वच्छ होणार नाही, तर स्वच्छता ही सवय झाली पाहिजे, असे नरेंद्र मोदी म्हणाले.

याचबरोबर, नरेंद्र मोदी यांनी स्वच्छता अभियानातील सहकार्याबद्दल अमिताभ बच्चन आणि रतन टाटा यांचे आभार मानले. अमिताभ बच्चन यांनी स्वच्छतेसाठी जनजागृती केली, त्यासाठी त्यांना माझ्याकडून खूप शुभेच्छा आहेत. फक्त स्वच्छतेच्याच नाही तर सामाजिक अभियानांमध्ये अमिताभ बच्चन यांचे मोठे योगदान आहे, असे नरेंद्र मोदी यांनी सांगितले. तसेच, टाटा ट्रस्टचे स्वच्छता अभियानासाठी १०० कोटी रुपयांचे योगदान असल्याचेही नरेंद्र मोदी म्हणाले. देशातील सर्व नागरीक आणि स्वच्छता प्रेमींनी या अभियानात भाग घेतल्यानेच स्वच्छता अभियान यशस्वी झाले. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, स्वच्छता अभियानामुळे आतापर्यंत ३ लाख लोकांचे प्राण वाचवण्यात आले आहेत, असेही नरेंद्र मोदी यांनी सांगितले.

# बेकायदा गर्भपात करणाऱ्या चौगुले रुग्णालयावर पोलीस आणि वैद्यकीय विभागाचा छापा




**सांगली -** बेकायदा गर्भपाताच्या घटनेने सांगली पुन्हा एकदा हादरली. येथील चौगुले रुग्णालयामध्ये ६ बेकायदा गर्भपात झाल्याचे उघडकीस आले आहेत. पोलीस आणि वैद्यकीय विभागाने रुग्णालयावर धाड टाकून डॉ. रुपाली चौगुले यांना ताब्यात घेतले आहे.

शहरात बेकायदेशीर गर्भपात सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आलेला आहे. सांगली महापालिकेच्या आरोग्य विभाग आणि पोलिसांनी मिळून संयुक्तरीत्या चौगुले हॉस्पिटलवर छापा टाकत हा प्रकार उजेडात आणला आहे. गेल्या एक वर्षापासून विनापरवाना गर्भपात करण्यात येत असल्याची माहिती समोर आली आहे. संशयास्पद कागदपत्रे आणि औषधे आढळून आली आहेत. त्याचबरोबर या छाप्यामध्ये अनेक आक्षेपार्ह कागदपत्रे आणि दारूच्या बाटल्या ही यावेळी सापडल्या आहेत. तसेच हॉस्पिटलच्या कागदपत्रांची तपासणी केली असता या ठिकाणी सहा गर्भपात केल्याचे समोर आले आहे. आणखी किती बेकायदा गर्भपात करण्यात आले याचा तपास सुरू आहे. या प्रकरणी डॉक्टरासह तिघा जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तपासणी सुरू झाल्यानंतर हॉस्पिटलकडून काही औषधपत्रे जाळण्यात आली आहेत. यानंतर पोलिसांनी याठिकाणीचे औषधे व रोख रक्कम जप्त केली आहे. तर या हॉस्पिटलमध्ये आणखी बेकायदेशीर गर्भपात केल्याची शक्यता वर्तवली जात असून याबाबत तपास सुरू करण्यात आला आहे. गेल्या वर्षी म्हैसाळ येतील गर्भपातामुळे संपूर्ण महाराष्ट्र आणि कर्नाटक हादरुन गेला होता. पुन्हा एक वर्षा नंतर सांगली मध्ये बेकायदेशीर गर्भपाताचा प्रकार उघडकीस आल्याने खळबळ उडाली आहे.

# कॉसमॉस बँक सायबर दरोडा प्रकरणात आणखी दोघांना मुंबईतून अटक

**पुणे : कॉसमॉस बँकेच्या स्विचिंग सेंटरवर सायबर हल्ला करून ९४ कोटी ४२ लाख रुपये लांबविल्याप्रकरणी विरार आणि भिवंडी येथून दोघांना सायबर क्राईम सेलच्या गुन्हे शाखाने अटक केली आहे. त्यांना न्यायालयात हजर केले असता २४ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी आर. एच. जाधव यांनी हा आदेश दिला आहे.**

नरेश लक्ष्मीनारायण महाराणा (वय ३४, साईकृपा अर्पामेंट, नारंगी रस्ता, विरार, मूळ कुलीना टुकुरा, जि. बरगर, ओडिशा) आणि मोहंमद सईद इक्बाल हुसेन जाफरी ऊर्फ अली (वय ३०, रा. हमालवाडा, दर्गा रस्ता, भिवंडी) अशी अटक झालेल्यांची नावे आहेत. या प्रकरणात पोलिसांनी यापूर्वी चौघांना अटक केली आहे. त्यामुळे आता एकूण अटक आरोपींची संस्था ६ झाली आहे.



यापूर्वी शेख मोहंमद अब्दुल जब्बार (वय २८, मिर्झा कॉलनी, औरंगाबाद) आणि महेश साहेबराव राठोड (वय २२, धावरीतांडा, नांदेड), फहिम मेहफूज शेख (वय २७, रा. नुरानी कॉम्पलेक्स, भिवंडी) आणि फहिम अझीम खान (वय ३०, रा. सीमा हॉस्पिटलच्या मागे, आझादनगर औरंगाबाद) यांना अटक करण्यात आली आहे. तर, आणखी पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जब्बार आणि रोठोड यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार महाराणा आणि जाफरी यांना अटक करण्यात आली आहे.

मुंबई, इंदूर, कोल्हापूर या ठिकाणच्या सीसीटीव्ही फुटेजवरून आरोपींची छायाचित्रे तयार करण्यात आली. मोबाईलची माहिती आणि आरोपींच्या फोटोंवरून ते भिवंडी, औरंगाबाद, हैदराबाद, गोवा आणि विरार येथील असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# CBSC टॉपर मुलीवरील सामूहिक बलात्कारात लष्कराचा जवान मुख्य आरोपी

**नवी दिल्ली -** सीबीएसई परीक्षेत टॉपर राहिलेल्या १९ वर्षीय तरुणीवर १२ जणांनी बलात्कार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आल्यानंतर पोलीस तपासाला वेग आला असून चौकशीतून एक खळबळजनक माहिती पुढे आली आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी लष्काराचा जवान असल्याचं पोलीस सूत्रांनी सांगितलं. त्याचं नाव पंकज असल्याचं समजतं. राजस्थानमध्ये पोस्टिंग असलेला हा शिपाई सुटीवर हरयाणात आला होता.

रेवारीतील सामूहिक बलात्कार प्रकरणानं देश हादरला आहे. सीबीएसई परीक्षेत अव्वल आलेली विद्यार्थिनी १२ सप्टेंबरच्या दुपारी कनिना गावात शिकवणीला जाण्यासाठी बसथांब्यावर उभी असताना तीन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी तिचं कारमधून अपहरण केलं. तिला शीतपेयामधून गुंगीचं औषध पाजलं आणि झज्झरच्या सीमेनजीकच्या शेतात तिच्यावर १२ जणांनी बलात्कार केला.

आनंदाची बातमी
सुरू होत आहे..
*MULTIMEDIA* शाखा
या मंगळवारी, १८ सप्टेंबर, २०१८.. सायंकाळी ५ वाजता आपण व खालील क्षेत्रात स्वारस्य असलेले आपले सर्व मित्र-आप्तेष्ट आमंत्रित आहात.
*Web designing*
Graphic designing
*Audio Video Production*
CAD & 3D
*Architectural Design*
Digital Art & Paint
*Fashion designing*
Animation*, etc..
यांचे विशेष अभ्यासवर्ग
स्थळ
००४/ब-७, सेक्टर-१०
रिषीकेश शांतीनगर, मिरारोड, ठाणे
अधीक तपशीलासाठी संपर्क -
८८९८२२०१११
परीणिता सामंत
SWARAAKRITI
Institute of Art & Music

# धक्कादायक ! परभणीतील वेद पाठशाळेत अल्पवयीन मुलांवर लैंगिक अत्याचार

परभणीत वेद पाठशाळेत तीन अल्पवयीन मुलांवर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. श्री गणेश वेद पाठशाळेत हा धक्कादायक प्रकार घडला आहे. मुलांवर अमानुषपणे अत्याचार करत लैंगिक शोषण करण्यात आल्याचं पोलिसांनी सांगितलं आहे. पोलिसांनी सर्व मुलांचा जबाब नोंदवला असून त्याआधारे गुन्हा दाखल केला आहे. महत्त्वाचं म्हणजे आरोपींमध्ये अल्पवयीन मुलांचा समावेश असून ते संस्थाचालकांच्या नात्यातील असल्याचं वृत्त आहे.

नवामोंढा पोलीस ठाण्यात पाठशाळेचे संचालक सुधीर कुलकर्णी यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यांना अटकही करण्यात आली आहे. सुधीर कुलकर्णी यांच्यासहित अन्य दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुधीर कुलकर्णी यांनी मुलांवर लैंगिक अत्याचार होत असल्याचं माहित असतानाही त्यांनी याकडे डोळेझाक केल्याचा पालकांचा आरोप आहे.



अत्याचार करण्यात आलेल्या तिघांपैकी एका मुलावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. मुलांनी आपल्या पालकांना सांगितल्यानंतर हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. पालकांनी जिल्हा पोलीस अधीक्षक कृष्णकांत उपाध्याय यांची भेट घेऊन घटनेची सविस्तर माहिती दिली. यानंतर त्यांनी तक्रार दाखल करुन घेण्याचा आदेश दिला. पोलिसांनी पीडित मुलांचा जबाब नोंदवून घेतला आहे.

घटना उघड झाल्यानंतर ब्राह्मण समाजातून संताप व्यक्त केला जात आहे. आरोपींविरोधात कारवाई करण्यासाठी पोलीस ठाण्यात लोकांनी गर्दी केली होती. दरम्यान पालकांनी तक्रार मागे घेण्यासाठी आपल्यावर दबाव आणला जात असल्याचं म्हटलं आहे.

# भाजपासाठी धोक्याची घंटा?

## पंतप्रधानपदासाठी आंध्र प्रदेशची राहुल गांधींना पसंती

२०१९ मधील लोकसभा निवडणुकीत ३०० पेक्षा अधिक जागांवर विजय मिळवण्याचा निर्धार भाजपाने केला असतानाच ताज्या सर्वेक्षणाने नरेंद्र मोदी व भाजपाच्या गोटात चिंता निर्माण होऊ शकते. आंध्र प्रदेशमधील जनतेने पंतप्रधानपदासाठी राहुल गांधींना पसंती दर्शवली असून कर्नाटक आणि तेलंगण या राज्यांमध्ये राहुल गांधींनी नरेंद्र मोदींना 'कांटे की टक्कर' दिली आहे.



इंडिया टुडे आणि ॲक्सिस माय इंडिया या संस्थेने तेलंगण, आंध्र प्रदेश आणि कर्नाटक या तीन राज्यांमधील जनतेचे मत जाणून घेतले. विशेष म्हणजे आंध्र प्रदेशमध्ये राहुल गांधी यांनी नरेंद्र मोदींवर मात केली आहे. आंध्र प्रदेशमध्ये सर्वेक्षणात सहभागी झालेल्यांपैकी ४४ टक्के लोकांनी पंतप्रधानपदासाठी राहुल गांधींच्या नावाला पसंती दर्शवली आहे. तर नरेंद्र मोदींना ३८ टक्के लोकांनी पाठिंबा दिला. या राज्यात तेलगू देसम पक्षाची पिछेहाट होताना दिसते. ३९ टक्के लोकांनी मुख्यमंत्रीपदासाठी वायएसआर काँग्रेसचे जगनमोहन रेड्डी यांच्या नावाला पाठिंबा दिला. तर ३८ टक्के लोकांनी चंद्राबाबू नायडू यांना पसंती दर्शवली.

कर्नाटकमध्ये काँग्रेस- जनता दल सेक्यूलर आघाडीबाबत जनतेत नाराजी असल्याचे दिसते. ३५ टक्के लोकांनी विद्यमान सरकारच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली. कर्नाटकमधील सुमारे साडे अकरा हजार लोकांचे मत या सर्वेक्षणात जाणून घेण्यात आले. कर्नाटकात ५५ टक्के लोकांनी नरेंद्र मोदींना तर ४२ टक्के लोकांनी राहुल गांधींच्या नावाला पसंती दर्शवली.

तेलंगणात के. चंद्रशेखर राव सरकारच्या कारभारावर ४८ टक्के लोकांनी समाधान व्यक्त केले. या राज्यात पंतप्रधानपदासाठी ४४ टक्के लोकांनी नरेंद्र मोदींना पाठिंबा दर्शवला. तर राहुल गांधींना ३९ टक्के लोकांनी पाठिंबा दिला आहे. या राज्यात सर्वेक्षणात ७, ११० लोकांचे मत जाणून घेण्यात आले.

# अप्रमाणित औषधांसाठी चीनकडून कच्चा माल; राज्याबाहेर उत्पादन

**अमरावती :** अन्न व औषध प्रशासनाकडून तपासण्यात आलेल्या औषध नमुन्यांपैकी अप्रमाणित आढळलेल्या नऊ औषधांचे उत्पादन राज्याबाहेरचे आहे. यापैकी काही कंपन्यांवर खटले दाखल करण्यात आले असून, ते प्रकरण सद्यस्थितीत न्यायप्रविष्ट आहेत.



एफडीए अमरावतीमार्फत जिल्ह्यातील विविध औषध विक्रेत्यांजवळील नमुन्यांची तपासणी करण्यात आली होती. त्यात राज्याबाहेरील कंपन्यांनी उत्पादित केलेल्या नऊ औषध अप्रमाणित आढळले. त्यामध्ये अँटिबायोटिक टॅबलेटचा सर्वाधिक सहभाग आहे. या औषधांचा साठा बाजारपेठेतून परत बोलाविण्यात आला होता. अप्रमाणित आढळलेल्या नऊ औषध कंपन्यापैकी सहा कंपन्यांवर प्रशासकीय कारवाई करण्यासाठी एफडीएने राज्य प्रशासनाला कळविले आहे, तर तीन प्रकरणांमध्ये संबंधित कंपन्याविरुद्ध एफडीएने न्यायालयीन खटले दाखल केले. औषधामधील गुणधर्म (कन्टेन्ट) व ठरवून दिलेले घटक कमी आढळून आल्याने त्या अप्रमाणित ठरल्या आहेत.

अखिल भारतीय मानव अधिकार युनियन
सभासद नोंदणी सुरु
अध्यक्ष : श्री. दिपक मोरेश्वर नाईक मो. ८४२४९८९८९८
सचिव : श्री. विनोद दशरथ मेढे मो. ८६९२०११११०
सदस्य नोंदणी कार्यालय - २, राजाराम अपार्टमेंट.
बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), ठाणे - ४०१ १०५

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)